दुग्ध प्रकल्प दापचरी येथे उपलब्ध असलेल्या ९०७.२९ हेक्टर जमीनीपैकी ४४७.२९ हेक्टर जमीन पशुसंवर्धन विकास योजनांकरीता व उर्वरीत ४६० हेक्टर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास उपलब्ध करून देण्याकरीता महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांकः दुप्रदा-२०१६/प्र.क्र.१६६/पदुम-१०

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: २४ नोव्हेंबर, २०१७

वाचा :-

१) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्र. मऔविम/भूसं/D५५३३१/२०१६ दि. २५/१०/२०१६
२) आयुक्त पशुसंवर्धन यांचे पत्र क्र. पशुधन-१/दापचरी/प्र.क्र. ४५०/९३९/२०१७/पसं १३, पुणे, दि .११/०४/२०१७
३) उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचा दि. २३/०५/२०१७ रोजीचा शासन निर्णय
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, म. औ. वि. म., मुंबई यांचे अध्यक्षतेखाली दि. २१/०६/२०१७ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त
५) आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे पत्र क्र. आदुवि-१६ (५)/दापचरी जमीन/ मऔविमम /प्र. क्र . १७/२०१७/३५०५, दि .२०/०७/२०१७

प्रस्तावना :-

प्रस्तूत प्रकरणी दुग्ध प्रकल्प दापचरी यांच्या अधिपत्याखालील मौजे दापचरी, वंकास, खुबाळे, मोडगांव, वरखंडे, कुर्झे व उधला येथील ८६० हे. आर. इतकी जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी उपलब्ध करून देणेकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे दि. २५/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वये विनंती केल्याप्रमाणे उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचा प्रस्ताव या विभागास प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावावर आयुक्त (दुग्ध) व आयुक्त (पशुसंवर्धन) यांचेकडून प्राप्त अभिप्रायावरून तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे दि. २३/०५/२०१७ रोजीचे शासन निर्णयान्वये गठित समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने दुग्ध प्रकल्प, दापचरी येथे उपलब्ध असलेल्या ९०७.२९ हेक्टर जमिनीपैकी ४४७.२९ हेक्टर जमिन पशुसंवर्धन विकास योजनांकरीता आणि ४६० हेक्टर जमिन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास औद्योगिक विकासाठी उपलब्ध करून देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अधिपत्याखालील दुग्ध प्रकल्प दापचरी येथे उपलब्ध ९०७.२९ हेक्टर जमिनीपैकी ४४७.२९ हेक्टर इतके क्षेत्र पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांसाठी उपलब्ध करून देण्याकरीता या शासन निर्णयान्वये महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्यात येत आहे.

तसेच राज्यातील पायाभूत सुविधांचा विकास जलद गतीने होण्यासाठी, विभागाच्या ताब्यात असलेल्या जमिनीचा वापर अधिक परिणामकारक रीतीने करण्यासाठी तसेच नवनिर्मित पालघर जिल्ह्यातील रहिवासींचा विकास साधण्यासाठी त्याठिकाणी उद्योगांची वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अधिपत्याखालील दुग्ध प्रकल्प दापचरी येथील उर्वरीत ४६० हेक्टर क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी उपलब्ध करून देण्याकरीता महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना प्रत्यार्पित करण्यात आलेल्या जमिनीचे क्षेत्र ग्रामीण भागात मोडत असल्याने रेडीरेकनर दराच्या दोन पट दर सदर जमिनीची किंमत ठरविताना ग्राह्य धरण्यात यावेत. तसेच सदर जमिनीच्या किंमतीतून मिळणारी रक्कम पदुम विभागास खात्यामार्फ़त राबविण्यात येणा-या योजनांसाठी प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात यावी, या अटीस अधिन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२४१२०३३३७००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Tanbaji Uike

Digitally signed by Ashok Tanbaji Uike
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87cfab3c12a61b33987277f837a341fb6c84ebe6d1bf10339d150649af95e5b8, cn=Ashok Tanbaji Uike
Date: 2017.11.24 13:49:09 +05'30'

(अशोक उईके)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
५. विभागीय आयुक्त (महसूल), कोकण विभाग, मुंबई
६. आयुक्त दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
७. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य पुणे
८. जिल्हाधिकारी, पालघर
९. निवड नस्ती, पदुम-१०